नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०१९
पुष्पा .वि. यादवराव वगैरे
निशाणी क्र.२८

**वादींतर्फे साक्षीदार क्र.१ म्हणुन वादी पुष्पा लिलाधर बारमासे यांची पुढील उलटतपासणी प्रतिवादींचे अधिवक्ता श्री.एस.एम.नाफडे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

२७. माझे आजोबा तुळशीराम यांना किती भाउ बहीण होते हे मला सांगता येणार नाही. हे मला माहीती नाही कि उपासराव बनकर व बाळकृष्ण बनकर हे तुळशीराम यांचे भाउ आहे किंवा कसे. हे म्हणने खरे आहे कि, मी दावा दाखल करण्यापूर्वी वाद शेती तुळशीराम बनकर यांच्या नावे कशी झाली याबाबत माहीती घेतली नव्हती. हे म्हणने खरे आहे कि, तुळशीराम नंतर प्रतिवादी क्र.१ यांचे एकटयाचे नाव वाद शेताच्या ७/१२ मध्ये कसे दर्ज झाले याबाबत सुध्दा मी माहीती घेतली नाही. हे म्हणने खरे आहे कि, माझा भाउ लिलाधर व गंगाधर हे यादवराव पासून वेगळे राहतात. साक्षिदार स्वताहुन सांगते कि यादवराव व गंगाधर हे एकत्र राहतात.

२८. हे म्हणने खरे आहे कि, वाद शेत सर्वे क्र.११३/१ हे लिलाधरच्या नावे व शेत सर्वे क्र.११३/२ हे गंगाधर यांच्या नावे दर्ज झाले आहे. हे म्हणने खरे आहे कि, वाद शेत सर्वे क्र.११७ व ११९ हे माझ्या वडीलांच्या नावे आहे. हे म्हणने खरे आहे कि, वाद शेतांच्या फेरफार क्र.५५२ मध्ये माझ्या वडीलांमध्ये व भावांमध्ये वाद शेतांची आपसी हिस्सेवाटणी झाल्याचे नमुद आहे. हे म्हणने खरे नाही कि, वाद शेताची हिस्सेवाटणी करुन देण्याचा अधिकार प्रतिवादी क्र.१ ला होता व त्याप्रमाणे त्याने वाद शेताची हिस्सेवाटणी करुन दिली. मी वाद शेताची हिस्सेवाटणी करुन देण्याची मागणी माझ्या वडीलांकडे केली होती. हे म्हणने खरे नाही कि, मी माझ्या मताप्रमाणे हिस्सेवाटणी मागितल्यामुळे माझ्या वडीलांनी हिस्सेवाटणीस नकार दिला होता. हे म्हणने खरे आहे कि, माझ्या लग्नाचा खर्च माझ्या वडीलांनी केला आहे. हे म्हणने खरे नाही कि, लग्नाच्यावेळी माझ्या वडीलांनी माझ्या पतीला नगदी अंशी हजार रुपये व सोन्याचे दागिने दिले होते.

२९. हे म्हणने खरे आहे कि, आमच्याध् कुटुंबाचे प्रमुख व्यक्ती प्रतिवादी क्र.१ आहे.

हे म्हणने खरे नाही कि, वाद शेती हया वडीलोपार्जीत नाही. हे म्हणने खरे नाही कि, वाद शेतांमध्ये मला हिस्सा मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणने खरे नाही कि, माझा वाद शेतांमध्ये १/५ हिस्सा आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही कि, सन २०१४ पासुन माझे माझ्या वडीलांशी संबंध खराब झाले. हे म्हणने खरे नाही कि, मी खोटा दावा दाखल केला. हे म्हणने खरे नाही कि, मी माझ्या पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणने खरे नाही कि, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही**

सा. वा. दा. अ. ब. अ. क.केले समक्ष

(पी. आर. पाटील)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर
दिनांक–२६.०८.२०२४

(पी. आर. पाटील )
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव**– अ.य.कुळकर्णी (श्रेणी–३)